ePaper

आता शरद पवार अन् देवेंद्र फडणवीस यांच्यात फोनवरून चर्चा

॥ वर्ष - 8 । अंक -183 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥



महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 12 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

आतील पानांत

- तमीम - हेल्समध्ये मैदानातच जुंपली
- मॅच पाहायला गेला लखपती झाला
- बायकोला पाहत बसणं मला आवडतं
- रुपयाच्या घसरणीचे सर्व विक्रम मोडले

## नवाब मलिक यांची आक्रमक भूमिका

# महायुतीला धक्का बसणार?

### अजितदादा गटातही स्वबळाचे वारे...?

। मुंबई । महाईन्यूज

**उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने राज्यातील सर्व महापालिका निवडणुका स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत उभी फूट पडली आहे. एकीकडे महाविकास आघाडीत या घटना घडत असतानाच अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीतही स्वबळावर निवडणुका लढण्याचं घटत आहे.**



आज राष्ट्रवादीची बैठक पार पडली. यावेळी राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक यांनी स्वबळाचा नारा दिला. महापालिका स्वबळावर लढली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. त्यामुळे राष्ट्रवादी स्वबळावर लढणार का? महाविकास आघाडीपाठोपाठ महायुतीलाही धक्का बसणार का? अशी चर्चा सुरू झाली आहे.

राष्ट्रवादीची माटुंग्यात आज बैठक होती. महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने या बैठकीचां आयोजन करण्यात आलं होतं. या बैठकीला नवाब मलिक, आमदार सना मलिक आणि सिद्धार्थ कांबळे उपस्थित होते. या शिवाय पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नवाब मलिक यांनी स्वबळावर लढण्याची आग्रही मागणी धरली. राष्ट्रवादीच्या स्थापनेनंतर या मुंबईत आपण कधीच 14 पेक्षा जास्त नगरसेवक निवडून आणू शकलो नाही. एकसंघ असतानाही आपण कधीच जास्त नगरसेवक निवडून आणले नाहीत. आता पक्षाचे दोन भाग झाल्यावर कार्यकर्त्यांच्या मनात चिंता आहे. कार्यकर्ते संभ्रमित आहेत. महापालिका निवडणुकीत स्वबळावर लढायचं की महायुतीत लढायचं हा संभ्रम आहे, असं नवाब मलिक म्हणाले.

#### मित्र पक्ष सोबत घेईल हे विसरा

जोपर्यंत एखाद्या पक्षाची ताकद नसते तोपर्यंत त्या पक्षाला कोणीही विचारत नाही. आज मित्र पक्ष तुम्हाला सोबत घेईल हे विसरून जा. तुमची ताकद असेल तरच मित्र पक्षही तुम्हाला विचारेल. त्यामुळे तुम्हाला मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढावीच लागेल. तुम्हाला तुमची ताकद निर्माण करावीच लागेल, असं नवाब मलिक म्हणाले.

#### तर वेगळा ठसा निर्माण करू शकतो

नवीन लोकं जोडल्याशिवाय पक्ष वाढत नाही. तुम्हाला वाटत असेल भाजपसोबत जायचं आहे, भाजपसोबत जायचं आहे. पण भाजप परमनंट आपल्यासोबत राहील असं वाटत असेल तर हा विचार सोडून द्या. राजकारणात कोणीही कुणासोबत परमनंट राहत नाही. जो ताकदवान असतो त्याला लोकं विचारतात. ताकद नसेल तर तुम्हाला कुणी विचारणार नाही. उद्या चालते व्हा म्हणून सांगू शकतील, पण आपली ताकद असेल तर आपण स्वबळावर या मुंबईत वेगळा ठसा निर्माण करू शकतो. 14 पेक्षा जास्त नगरसेवक आले नाही, हा आपल्यावरचा ठपका आहे. आपण व्यवस्थित लढलो आणि बुथवर 100 मतांची ताकद निर्माण केली तर आपण जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणू शकतो. आपल्यावरचा ठपका आपण पुसून टाकू शकतो, असंही त्यांनी सांगितलं.

## उबाठा महापालिका निवडणुका स्वबळावर लढणार

### 'मविआ'ही विसर्जनाकडे; राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांची घोषणा

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील महाविकास आघाडीही विसर्जित होण्याच्या मार्गावर आहे. आगामी महानगरपालिका निवडणुका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष स्वबळावर लढेल, अशी घोषणा पक्षाचे नेते आणि राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांनी शनिवारी केली.**



मुंबई : इंडिया आघाडीतील घटक पक्षांनी दिल्लीमध्ये काँग्रेसची साथ सोडली असताना, आता राज्यातील महाविकास आघाडीही विसर्जित होण्याच्या मार्गावर आहे. आगामी महानगरपालिका निवडणुका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष स्वबळावर लढेल, अशी घोषणा पक्षाचे नेते आणि राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांनी शनिवारी केली. यानंतर काँग्रेससारखा मोठा पक्ष 'आप', शिवसेना (उबाठा) आणि इतर लहान पक्षांना सोबत ठेवण्यात अपयशी ठरल्याची प्रतिक्रिया राजकीय वर्तुळात उमटू लागली आहे.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या भेटीसाठी ते नागपुरात आले असता राऊत माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते. 'मुंबईसह नागपूर महापालिका आम्ही स्वबळावर लढवू, काय होईल ते होईल. एकदा आम्हाला पाहायचे आहे. उद्धव ठाकरे यांनी आम्हाला तसे संकेत दिले आहेत. मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर येथील कार्यकर्त्यांना संधी कधी मिळणार? आघाडीमध्ये कार्यकर्त्यांना लढण्याची संधी मिळत नाही. त्याचा फटका पक्षाला, किंबहुना पक्षाच्या वाढीला बसतो. महापालिका, जिल्हा परिषद आणि नगरपंचायतीत स्वबळावर लढून आपापले पक्ष मजबूत करावेत,' असेही राऊत यांनी यावेळी नमूद केले.

#### आघाडीतील बिघाडी पुन्हा एकदा समोर

दरम्यान, संजय राऊत यांच्या या घोषणेनंतर महाविकास आघाडीतील बिघाडी पुन्हा एकदा समोर आली आहे. इंडिया आघाडीपाठोपाठ महाविकास आघाडीतील ही धुसफूस लक्षात घेता, हे काँग्रेस पक्षाचे अपयश मानले जात आहे. काँग्रेस बिगर भाजप पक्षांची इंडिया आघाडी या नावाने बांधलेली मोट यशस्वीरित्या सांभाळेल, असा अनेकांचा होरा होता, मात्र तो खोटा ठरला आहे. शिवसेना (उबाठा) पक्षाने स्वबळाचा नारा दिल्यानंतर आता मुंबई महापालिकेत काँग्रेसची अवस्था अत्यंत दयनीय होण्याच्या मार्गावर आहे.

# न-हे परिसरात जड वाहनांना बंदी!

## तरुणाकडून वाहतूक पोलिसाला मारहाण, हडपसर भागातील घटना

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंबई-बंगळुरु बाह्यवळण मार्ग परिसरातील भूमकर चौक भुयारी मार्ग ते नऱ्हे गावातील श्री कंट्रोल चौक दरम्यान जड वाहनांना बंदी घालण्याचे आदेश पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिले. या भागातील गंभीर अपघातांच्या पार्श्वभूमीवर सकाळी सात ते अकरा आणि सायंकाळी पाच ते रात्री नऊ यावेळेत जड वाहनांना बंदी घालण्यात येणार आहे.**



बाह्यवळण मार्गावरील नऱ्हे, धायरी परिसराचा पुणे महापालिकेत समावेश झाला आहे. या भागात शैक्षणिक संस्था आहेत, तसेच खासगी कंपन्या आहेत. विद्यार्थी वाहतूक करणारी वाहने या परिसरातून जातात. मुंबई-बंगळुरू बाह्यवळण परिसरातील अनेक इमारती आहेत. या भागातील वाहतूक, वाढती लोकसंख्या, तसेच अपघातांचे प्रमाण विचारात घेऊन भूमकर चौकातील भुयारी मार्ग ते नऱ्हे गावातील श्री कंट्रोल चौक दरम्यान जड वाहनांना बंदी घालण्याचे आदेश पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिले आहेत.भूमकर चौक ते श्री कंट्रोल चौक दरम्यानचा मार्ग अरुंद आहे. या भागात गर्दीच्या वेळी दररोज सकाळी आणि सायंकाळी जड वाहनांमुळे कोंडी होते. त्यामुळे दररोज सकाळी सात ते अकरा आणि सायंकाळी पाच ते रात्री नऊ यावेळेत जड वाहनांना बंदी घालण्यात येणार आहे. या परिसरातील रस्ते, अंतर्गत रस्त्यांवर वाहने लावण्यास मनाई करण्यात आली. अत्यावश्यक सेवेतील वाहनांना सूट देण्यात आली आहे, असे पोलीस उपायुक्त झेंडे यांनी कळविले आहे.सिंहगड रस्त्यावरील मॅकडोनाल्डस् उपहारगृहसमोर दोन्ही बाजूस ५० मीटर अंतरापर्यंत सर्व प्रकारची वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती किंवा सूचना असल्यास वाहतूक पोलीस उपायुक्त कार्यालय, येरवडा, गोल्फ क्लब रस्ता येथे लेखी स्वरुपात कळवाव्यात, असे आवाहन पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी केले आहे.मद्यधुंद तरुणाने वाहतूक पोलिसांशी वाद घालत मारहाण केल्याची घटना शनिवारी सायंकाळी हडपसरमधील मगरपट्टा परिसरात घडली. या घटनेची चित्रफीत समाज माध्यमात प्रसारित झाली. याप्रकरणी रात्री उशीरा तरुणाला हडपसर पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### लोकांमध्ये कुठून येतो एवढा माज?

स्थानिकांनी वेळीच हस्तक्षेप करत त्याला रोखले.घटनेची माहिती मिळताच हडपसर वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक आणि हडपसर पोलीस घटनास्थळी तात्काळ पोहोचले. यानंतर त्यांनी नशेखोर आरोपीला ताब्यात घेतलं. रात्री उशीरापर्यंत त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याचं काम सुरु होतं. आरोपीने सदर मारहाण का केली? याचे कारण मात्र अद्याप समजू शकलेलं नाही. दरम्यान सोशल मीडियावर मात्र याबाबत नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. शेखर नावाच्या एका एक्स युजरने या घटनेचा व्हिडीओ शेअर केला आहे. "लोकांमध्ये कुठून येतो एवढा माज?", असा प्रश्न एक्स युजरने उपस्थित केला आहे.गेल्या काही काळापासून पुण्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाल्याचे दिसत आहे. ४ जानेवारी रोजी आळंदी वाहतूक शाखेतील सहायक पोलिस उपनिरीक्षक अंकुश वाडेकर यांनाही एका तरुणाने मारहाण केली होती.

हडपसर वाहतूक विभागातील पोलीस कर्मचारी शनिवारी सायंकाळी मगरपट्टा परिसरातील रासकर चौकात वाहतूक नियमन करत होते. त्यावेळी विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांवर ते कारवाई करत होते. त्यावेळी एक जण तिथे थांबलेल्या नागरिकाला दगडाने मारण्याचा प्रयत्न करत होता. त्यावेळी तेथे वाहतूक नियमन करणाऱ्या वाहतूक पोलिसाने त्याला हटकले. वाहतूक पोलिसाने हटकल्याने तरुणाने वाहतूक पोलिसाला मारहाण केली. या घटनेची चित्रफीत समाज माध्यमात प्रसारित झाली या घटनेची माहिती मिळताच हडपसर वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक तसेच हडपसर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी तरुण नशेत होता. मगरपट्टा येथे रस्त्यावर हुल्लडबाजी करत असताना या ठिकाणी कर्तव्य बजवात असलेल्या वाहतूक शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्याने त्याला हटकले. यावेळी राग अनावर होऊन आरोपीने थेट पोलीस कर्मचाऱ्याला शिवीगाळ करत त्यांच्यावर हल्ला केला.

# 'एफटीआयआय'ला अभिमत विद्यापीठाचा दर्जा?

## केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांचे संकेत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेला (एफटीआयआय) अभिमत विद्यापीठाचा दर्जा देण्याबाबत केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत शनिवारी चर्चा झाली. 'एफटीआयआय'ला जागतिक स्तरावर नेण्याच्या अनुषंगाने त्यांनी विद्यार्थी, शिक्षकांशी संवाद साधला.**




चित्रपट आणि दूरचित्रवाणी संदर्भात प्रशिक्षण देणारी एफटीआयआय ही संस्था माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या अखत्यारित आहे. त्यामुळे माहिती आणि प्रसारण मंत्रालयाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर पहिल्यांदाच वैष्णव यांनी 'एफटीआयआय'ला भेट दिली. या भेटीमध्ये त्यांनी संस्थेतील विविध सोयीसुविधांची पाहणीही केली.'एफटीआयआय'ला अभिमत विद्यापीठाचा दर्जा देण्याच्या अनुषंगाने विद्यार्थी, शिक्षकांच्या प्रश्नांना उत्तरे देताना त्यांनी गतिशक्ती विश्वविद्यालयाचे उदाहरण देऊन, ही संस्था अल्प कालावधीत जगासाठी गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ पुरवत असल्याचे नमूद केले. विद्यार्थी, शिक्षकांशी संवाद साधताना वैष्णव यांनी देशातील चित्रपट शिक्षणाविषयीचे त्यांचे विचार मांडले. तसेच, विद्यार्थ्यांना अधिक करिअरसंधी प्राप्त होण्यासाठी उद्योगांशी अधिक सहकार्य करण्यावर त्यांनी भर दिला.संस्थेत उभारण्यात आलेल्या सभागृहाचे उद्घाटनही वैष्णव यांनी केले. या ५८६ आसनक्षमता असलेल्या सभागृहात प्रोजेक्टर, पीए सिस्टीम, सराउंड साउंड अशी आधुनिक व्यवस्था करण्यात आली आहे. ५० फूट रुंद आणि २० फूट उंच असा भव्य पडदा या चित्रपटगृहात आहे. विशेष म्हणजे या पडद्याचे संचालन रिमोट कंट्रोलद्वारे करून सभागृहाचे चित्रपटगृहात रूपांतर करणे शक्य आहे.

### नव्या सभागृहाचे उद्घाटन

पहिल्यांदाच अशी अनोखी व्यवस्था विकसित करण्यात आली असून, त्यासाठीच्या एकस्व अधिकारासाठी (पेटंट) 'एफटीआयआय'ने अर्ज केला आहे. नवे सभागृह 'एफटीआयआय'च्या अध्यापनासाठी महत्त्वाचे ठरणार आहे.राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेला (एफटीआयआय) अभिमत विद्यापीठाचा दर्जा देण्याबाबत केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत शनिवारी चर्चा झाली. 'एफटीआयआय'ला जागतिक स्तरावर नेण्याच्या अनुषंगाने त्यांनी विद्यार्थी, शिक्षकांशी संवाद साधला.

## फेरीवाले व विक्रेत्यांच्या सर्वेक्षणाला दोन वर्षे पूर्ण

# डिजिटल स्वाक्षरीअभावी परवान्यांचे वाटप रखडले !

## पात्र फेरीवाल्यांना परवाने, ओळखपत्र व प्रमाणपत्र दिले नाही

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील फेरीवाले व विक्रेत्यांच्या सर्वेक्षणाला दोन वर्षे पूर्ण होऊनही पात्र फेरीवाल्यांना परवाने, ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. केवळ डिजिटल स्वाक्षरीअभावी परवान्यांचे वाटप रखडले आहे. शहरातील १५ हजार १३ फेरीवाले परवान्यापासून वंचित आहेत. दुसरीकडे परवाना नसल्याने महापालिका प्रशासन कारवाईचा बडगा उगारत आहे. त्यामुळे हातावर पोट असलेल्या फेरीवाल्यांना जगण्याची भ्रांत निर्माण झाली आहे.**



न्यायालयाच्या आदेशानंतर महापालिकेने फेरीवाला कायद्यानुसार १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत शहरातील फेरीवाले व विक्रेत्यांचे सर्वेक्षण केले. त्यात एकूण १८ हजार ६०३ फेरीवाल्यांची नोंदणी झाली. छाननी, तसेच सुनावणीत कागदपत्रांची पूर्तता न केल्याने काही अर्ज बाद करण्यात आले. शहरातील एकूण १५ हजार १३ फेरीवाले पात्र ठरले आहेत. मात्र, सर्वेक्षण होऊन दोन वर्षे झाले, तरी परवाना, ओळखपत्र व प्रमाणपत्र दिले गेलेले नाही. महापालिकेच्या भूमी आणि जिंदगी विभागाने, तसेच, सर्व आठ क्षेत्रीय कार्यालयांच्या नोंदणीसाठी एक हजार रुपये शुल्क आकारले आहे.

ओळखपत्र व प्रमाणपत्रासाठी प्रत्येकी २०० रुपये शुल्क आहे. असे एकूण एक हजार ४०० रुपये शुल्क ऑक्टोबरमध्ये घेतले. शहर फेरीवाला समितीच्या आठ सदस्यांची निवडणूक २० ऑक्टोबरला झाली. समितीचे आठ सदस्य निवडून आले. तरीही, अद्याप फेरीवाल्यांना परवाना, ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. दुसरीकडे ओळखपत्र, परवाना नसल्याने महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाकडून त्रास दिला जात असल्याने फेरीवाल्यांनी नाराजी व्यक्त केली.

पात्र फेरीवाल्यांना ओळखपत्र देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांची डिजिटल स्वाक्षरी, सर्वेक्षण करताना मुदतवाढही देण्यात आली होती. त्यानंतर निवडणूक आचारसंहिता लागली. त्यामुळे प्रमाणपत्र देण्यास विलंब झाला आहे. क्षेत्रीय कार्यालयाकडून प्रक्रिया केली जात आहे. परवाना, ओळखपत्र लवकरच देण्यात येणार असल्याचे भूमी आणि जिंदगी विभागाचे सहायक आयुक्त मुकेश कोळप यांनी सांगितले.

### परवाना वाटप प्रक्रियेला गती द्यावी

फेरीवाल्यांचे सर्वेक्षण होऊन दोन वर्षे पूर्ण झाले. मात्र, अद्यापही परवाने दिले नाहीत. सर्वेक्षण करताना सर्व कागदपत्रे तपासली आहेत. त्याच वेळी ओळखपत्र व परवाना दाखला देण्यास काय अडचण होती? शुल्क भरल्याची पावती दाखविल्यानंतरही अतिक्रमण कारवाई केली जाते. हे थांबले पाहिजे, अशी मागणी फेरीवाले किरण लोंढे यांनी केली.महापालिका प्रशासनाने परवाना वाटप प्रक्रियेला गती द्यावी. फेरीवाल्यांना तत्काळ परवाना, ओळखपत्र द्यावे, असे फेरीवाला क्रांती महासंघाचे अध्यक्ष काशिनाथ नखाते म्हणाले.

---

## बालविवाह प्रकरणी १२ जणांवर गुन्हा

### आळंदी येथील मंगल कार्यालयाच्या संचालकावरही गुन्हा

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आळंदी येथे बालविवाहाचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीच्या पतीसह १२ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. आळंदी येथे वडगाव रस्त्यावरील गंधर्व मंगल कार्यालयात २१ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी सव्वाबाराच्या सुमारास हा प्रकार घडला.**




गौरव सुभाष मुरक्या (रा. साळवेश्वर नगर, ब्रह्मा-विष्णू महेश अपार्टमेंटच्या पाठीमागे, वसमत रोड, परभणी), याच्या सोबत बालिका वधुची आई, मामा, मामी (तिघे रा. कारेगाव, पुणे), सासरे सुभाष भोलाराम, सासू, शुभम सुभाष मुरक्या, जाउ, संतोष भोलाराम मुरक्या, प्रमोद भोलाराम मुरक्या (रा. परभणी), तसेच वडगाव रस्त्यावरील गंधर्व मंगल कार्यालयाचे संचालक व इतर सेवा पुरवणारे व्यवस्थापक यांच्यासह एका महिलेच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. मिलिंद सोपानराव वाघमारे (४५, रा. परभणी) यांनी याप्रकरणी शुक्रवारी (दि. १०) आळंदी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मिलिंद वाघमारे हे परभणी येथील नागरी पक्रकल्पाचे बालविकास प्रकल्प अधिकारी तथा परभणी येथील शहर विभागाचे बालविवाह प्रतिबंध अधिकारी आहेत. १७ वर्ष पाच महिने वयाच्या अल्पवयीन मुलीचे गौरव मुरक्या याच्यासोबत संशयितानी लग्न लावून दिले. तसेच इतर संशयितांनी हा बालविवाह करण्यासाठी मदत केली. या बालविवाहाबाबत मिलिंद वाघमारे यांनी पोलिसांकडे तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

## पिंपरी-चिंचवड गुन्हेवृत्त: वाढीव पेन्शन मिळणार असल्याचे सांगून फसवणूक!

पिंपरी : वाढीव पेन्शन मिळणार असून त्याचा फरक व एरियस काढून देतो, असे सांगून महिलेची ९३ हजार ६०२ रुपयांची फसवणूक केली. वाकड येथे २५ ते २७ डिसेंबर २०२४ या कालावधीत ही घटना घडली.

याप्रकरणी एका महिलेने शुक्रवारी (दि. १०) वाकड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. शशिकांत बाळू मुडशी (३५, रा. धायरी) याच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्यातील पीएफ कार्यालयातील काम करतो, असे संशयित मुडशी याने फिर्यादी महिलेच्या पतीला भासवले. खासगी नोकरदार यांना वाढीव पेन्शन मिळणार असून, त्याचा फरक व एरियस काढून देतो, असे सांगून फिर्यादीचा विश्वास संपादन केला. तसेच त्यांच्याकडून ९३ हजार ६०२ रुपये घेऊन फिर्यादी महिलेची फसवणूक केली.

## कुठेही वाहन उभे करु नका! अन्यथा पडेल महागात...

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

कोणत्याही कामासाठी वाहनातून उतरल्यानंतर वाहन उभे करायचे असल्यास चालक रस्त्यावर मिळेल ती जागा निवडतात. अशा बेकायदा पार्किंगमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन वाहतूक कोंडी होऊ शकते, याचा कसलाही विचार केला जात नाही. मात्र, त्याविरोधात वाहतूक पोलिसांनी जोरदार कारवाई सुरू केली असून नियमांचे उल्लंघन करून रस्त्यावर कुठेही वाहन करणे आता चालकांना चांगलेच महागात पडत आहे.


पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयांतर्गत टोइंग व्हॅन योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या अंतर्गत वाहतुकीस अडथळा ठरतील, अशी वाहनांना टोइंग करून दंड आकारण्याबाबत कारवाई जोरात सुरू आहे. मागील महिनाभरात विविध वाहतूक विभागांतर्गत ५ हजार ८४५ वाहनांवर टोइंग कारवाई करण्यात आली असून ३२ लाख ८५ हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या रस्त्यांवर वाहनांची वर्दळ असते.

### अशी होत आहे कारवाई...

- दुचाकी वाहन टोइंग केल्यास त्या वाहनाला ५०० रुपये दंड, २०० रुपये टोइंग शुल्क आणि ३६ रुपये जीएसटी असा एकूण ७३६ रुपयांच्या दंडाची वसुली
- चारचाकी वाहनाला ५०० रुपये दंड, ४०० रुपये टोइंग शुल्क आणि ७२ रुपये जीएसटी असा एकूण ९७२ रुपयांचा दंड
- टोइंग कारवाई केलेल्या वाहनांवर पूर्वीचा दंड प्रलंबित असल्यास प्रलंबित दंडापैकी किमान एक दंड टोइंगच्या दंडासोबत भरणे बंधनकारक

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### नामाचे सूक्ष्म स्वरूप

नुसते ' राम राम ' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य ' नोकरी नोकरी ' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. ' रामनाम ' आणि ' नोकरी ' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. ' राम राम ' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वत:च्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा ' राम राम ' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्यांच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे ' नोकरी नोकरी ' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण ' राम राम ' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयींचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. ' राम राम ' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा ' नोकरी नोकरी ' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच ' राम राम ' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब ' राम राम ' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता ' राम राम ' जपावे. मनाच्या सर्व दु:खाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच: प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल.

# राज्य चालवावे नेटके...

**सरकारी कार्यालयांमध्ये आपली कामे वेळेत व्हावीत ही सामान्य नागरिकांची अपेक्षा आहे. ती पूर्ण करण्यात मुख्यमंत्री फडणवीस व त्यांचे सरकार यशस्वी झाल्यास महायुती सरकारवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल. शासकीय कामकाजात गतिमानता येण्यासाठी कठोर पावले मुख्यमंत्री फडणवीस यांना उचलावी लागतील.**



तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदी निवड झाल्यावर देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनात अधिक सुसूत्रता आणण्याकरिता शासकीय कार्यनियमावलीत (रुल्स ऑफ बिझनेस) सुधारणा करण्याबरोबरच सामान्य नागरिकांचे जीवन सुकर व्हावे यासाठी सात कलमी कृती कार्यक्रम जाहीर केला. देशात महाराष्ट्राच्या प्रशासनाचा आदर्श मानला जातो. प्रशासनानेही सरकारच्या कारभारात एक वेगळा ठसा उमटविला होता. एखादी गोष्ट चुकीची असल्यास ती करू नये, असे सांगण्याचे धाडस तेव्हा सनदी अधिकाऱ्यांमध्ये होते. विशेष म्हणजे तेव्हा अधिकाऱ्यांचा सल्ला गांभीर्याने घेतला जात होता. १९९५ नंतर एकापेक्षा अधिक पक्षांच्या आघाड्यांची सरकारे सत्तेत आली व तेव्हापासून राज्याची पीछेहाट सुरू झाली. त्याला प्रशासनही अपवाद ठरले नाही.

राज्यकर्त्यांचा वचक असल्यास नोकरशाही किंवा अगदी तळागाळातील कर्मचारी वेडेवाकडे वागण्याचे धाडस करीत नाहीत. त्याच वेळी राज्यकर्त्यांचे हात दगडाखाली असल्यास नोकरशाही डोईजड होते. पोलीस वा सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये अर्थकारण होते असे म्हटले जाते. तसे असल्यास हे अधिकारी पुढे मंत्र्यांनाही जुमानत नाहीत. राज्यकर्त्यांनी आमिषाला बळी पडू नये, असे संकेत असतात. या संदर्भात पुलोद सरकारमधील गृह राज्यमंत्री भाई वैद्या यांचे उदाहरण नेहमी दिले जाते. वैद्या यांच्या पुण्यातील निवासस्थानी एक फौजदार बदलीच्या कामासाठी आला व त्याने चांगल्या ठिकाणी बदलीसाठी पैसे देण्याची तयारी दर्शविली. भाई वैद्या यांनी तात्काळ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना पाचारण करून त्या फौजदाराला अटक करण्यास भाग पाडले होते. अशी काही उदाहरणे असतील पण ती विरळाच.


सामान्य नागरिकांसाठी सात कलमी कार्यक्रम राबविण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा उपक्रम स्तुत्यच आहे. यात शासकीय कार्यालयांमध्ये येणाऱ्या नागरिकांना सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात, नागरिकांच्या तक्रारी वा प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत, उद्योजकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी, नागरिकांचे जीवन सुकर व्हावे (ईझ ऑफ लिव्हिंग) या संकल्पनेवर काम करावे, शासकीय प्रकल्पांना भेटी द्याव्यात याचा या सात कलमी कार्यक्रमांमध्ये समावेश करण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांच्या या आदेशाची पूर्तता करण्याची जबाबदारी वरिष्ठांपासून ते स्थानिक अधिकाऱ्यांची. या कृती कार्यक्रमाची तंतोतंत अंमलबजावणी झाल्यास शासकीय कारभारात नक्कीच सुधारणा होईल.

फडणवीस पहिल्यांदा मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी २०१५ मध्ये नागरिकांना शासकीय सेवा पारदर्शकपणे, गतिमान वा कालबद्ध मुदतीत मिळाव्यात म्हणून 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम' केला होता. यात नागरिकांना विशिष्ट मुदतीत सेवा मिळाल्या पाहिजेत, अशी स्पष्ट तरतूद करण्यात आली होती. या नियमाची अंमलबजावणी करण्याकरिता सेवा हक्क आयोग स्थापन केला. सेवा हक्कामुळे नागरिकांना किती सेवा वेळेत मिळाल्या हा संशोधनाचा विषय ठरावा, पण स्वाधीन क्षत्रिय, मनुकुमार श्रीवास्तव या निवृत्त मुख्य सचिवांसह काही निवृत्त सचिवांची सोय लागली. विभागवार आयुक्त नेमण्यात आले. या पदांवर निवृत्त अधिकाऱ्यांची वर्णी लागली. एकूणच निवृत्तीनंतर या अधिकाऱ्यांना सरकारी पद मिळाले व त्या अनुषंगाने शासकीय निवासस्थाने, गाडी, नोकरचाकर ही व्यवस्था कायम राहिली. पण नागरिकांना सेवा किती जलद गतीने मिळाल्या?

**भारतात रस्तेअपघातांचे प्रमाण मोठे आहे. अशा अपघातांची संख्याच केवळ मोठी आहे असे नाही, तर त्यात जीव गमावणाऱ्यांची संख्याही जीव दडपून जाईल, अशी असते. देशात पायाभूत सुविधा वाढत आहेत, रस्त्यांचे जाळे वाढत आहे, वाहतूक वाढते आहे आणि त्यासोबत अपघातही वाढत आहेत.**

# कमावते हात वाचवण्यासाठी...

सन २०२४मध्ये देशभरातील एकूण रस्तेअपघातांमध्ये तब्बल १.८० लाख नागरिकांनी जीव गमावलेला आहे. यात बहुतांश वेळा अपघातानंतर वेळेत उपचार न मिळाल्याने, वेळेत रुग्णालयांत दाखल न केल्याने लाखमोलाचे प्राण वाचलेले नाहीत, हे अधोरेखित करणे महत्त्वाचे. वेळेत उपचार न मिळण्यामागे अनेक कारणे असतात. अपघाताचे प्रकरण म्हटले की पोलिसांत जाणे आले, कायद्याची भाषा आली आणि मुख्य म्हणजे पैशांचा प्रश्न आला. अनेकदा सरकारी रुग्णालये उपलब्ध नसतील, किंवा तेथे आवश्यक उपचार उपलब्ध नसतील तर अपघातातील जखमींना खासगी रुग्णालयांत न्यावे लागते. तेथील खर्च सामान्यांना परवडण्यासारखा असतोच असे नाही. यात बहुमूल्य वेळ वाया जातो व माणूस हातचा जातो. यावर उपाय म्हणून केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी



यांच्या मंत्रालयाने गेल्या वर्षी रस्ते अपघातातील जखमींसाठी मोफत कॅशलेस उपचारांची घोषणा केली होती; मात्र त्या घोषणेची गाडी अंमलबजावणीच्या रस्त्यावर अद्याप धावू लागलेली नाही. त्याची दखल घेऊन थेट सर्वोच्च न्यायालयाने ही योजना १४ मार्च २०२५ पर्यंत तयार करण्याचे केंद्र सरकारला दिलेले आदेश महत्त्वाचे ठरतात. अपघातानंतरचा एक तास उपचारांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा. कायद्याच्या भाषेत तो तास म्हणजे 'गोल्डन अवर'. या मोलाच्या तासात अपघातातील जखमींवर योग्य रुग्णालयात, योग्य उपचार सुरू झाले तर त्यांचा जीव वाचण्याची शक्यता किती तरी वाढते. या शक्यतेच्या मार्गात पैशांची अडचण येऊ नये, यासाठीची ही मोफत कॅशलेस उपचार योजना आहे. या योजनेनुसार जखमींवरील रुग्णालयातील उपचारांचा सात दिवसांचा किंवा कमाल दीड लाख रुपयांपर्यंतचा खर्च केंद्र सरकार करेल. आता, कॅशलेस उपचारांबाबत रुग्णालयांवर अनंत आक्षेप घेतले जातात. त्यातील गैरप्रकार चर्चिले जातात. बिलात होणारा फुगवटा डोळे विस्फारून पाहिला जातो. याबाबत सामान्यांचे अनुभव ऐकले तर याचा प्रत्यय येईल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयमधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महाविकास आघाडी उद्ध्वस्त होतेय

## ठाकरे गटाचा स्वबळाचा नारा; पवार गटाचा टोला

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा महायुतीने धुव्वा उडवला होता. विधानसभेच्या अपयशानंतर आता महाविकास आघाडीतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर यायला सुरुवात झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचे नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत. अशात पुढील काही महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. अशात आज शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी “मुंबईपासून ते नागपूरपर्यंत सर्व महापालिकेच्या निवडणुका आम्ही स्वबळावर लढवणार आहोत”, अशी घोषणाच केली आहे. राऊत यांच्या याविधानानंतर महाविकास आघाडीसह महायुतीतूनही प्रतिक्रिया यायला सुरुवात झाली आहे.**




दरम्यान संजय राऊत यांच्या स्वबळाच्या घोषणेवर राष्ट्रवादीने (अजित पवार) जोरदार टोला लगावत, महाविकास आघाडी उद्ध्वस्त होत असल्याचे लक्षात आल्याने संजय राऊत यांनी स्वबळाचा नारा दिल्याचे म्हटले आहे. राष्ट्रवादीचे (अजित पवार) प्रवक्ते प्रशांत पवार म्हणाले की, “संजय राऊत यांना महाविकास आघाडी उद्ध्वस्त होत असल्याची चाहूल लागली होती. त्यामुळे संजय राऊत यांनी नाना पटोले यांच्या नागपूर शहरात येऊन मुंबईपासून नागपूरपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढणार असल्याची घोषणा केली. ते स्वार्थासाठी एकत्र आले होते. पण, महाराष्ट्राच्या जनतेने त्यांना कायमचे हाकलून दिले आहे.”शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी आज माध्यमांशी बोलताना स्थानिक स्वराज्य संस्था स्वबळावर लढवणार असल्याचे विधान केले होते.

ते म्हणाले, “मुंबईपासून नागपूरपर्यंत आम्ही महापालिकेच्या निवडणुका स्वबळावर लढणार आहोत. मग काय होईल ते होईल? एकदा आम्हाला आमची ताकद बघायचीच आहे. आम्ही महापालिकेच्या निवडणुका स्वबळावर लढणार आहोत. नागपूरला सुद्धा आम्ही स्वबळावर लढणार आहोत. उद्धव ठाकरे यांनी यासंदर्भातील संकेत दिलेले आहेत. एकत्र लढलो तर कार्यकर्त्यांना संधी कधी मिळणार? कारण आघाडीत आणि विधानसभेत कार्यकर्त्यांना निवडणूक लढण्याची संधी मिळत नाही. त्याचा फटका पक्षाला आणि पक्षवाढीला बसत आहे. महानगरपालिका, जिल्हा परिषदा आणि नगरपंचायतीमध्ये निवडणुका स्वबळावर लढून आपआपले पक्ष मजबूत करावे लागतात.” दरम्यान संजय राऊत यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्वबळावर लढणार असल्याचे म्हटल्यानंतर, महाविकास आघाडीतूनही यावर प्रतिक्रिया यायला सुरुवात झाली आहे.राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा महायुतीने धुव्वा उडवला होता. विधानसभेच्या अपयशानंतर आता महाविकास आघाडीतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर यायला सुरुवात झाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचे नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत. अशात पुढील काही महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. अशात आज शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी “मुंबईपासून ते नागपूरपर्यंत सर्व महापालिकेच्या निवडणुका आम्ही स्वबळावर लढवणार आहोत”, अशी घोषणाच केली आहे. राऊत यांच्या याविधानानंतर महाविकास आघाडीसह महायुतीतूनही प्रतिक्रिया यायला सुरुवात झाली आहे.

### मग काय होईल ते होईल?

दरम्यान संजय राऊत यांच्या स्वबळाच्या घोषणेवर राष्ट्रवादीने (अजित पवार) जोरदार टोला लगावत, महाविकास आघाडी उद्ध्वस्त होत असल्याचे लक्षात आल्याने संजय राऊत यांनी स्वबळाचा नारा दिल्याचे म्हटले आहे. राष्ट्रवादीचे (अजित पवार) प्रवक्ते प्रशांत पवार म्हणाले की, “संजय राऊत यांना महाविकास आघाडी उद्ध्वस्त होत असल्याची चाहूल लागली होती. त्यामुळे संजय राऊत यांनी नाना पटोले यांच्या नागपूर शहरात येऊन मुंबईपासून नागपूरपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढणार असल्याची घोषणा केली. ते स्वार्थासाठी एकत्र आले होते. पण, महाराष्ट्राच्या जनतेने त्यांना कायमचे हाकलून दिले आहे.”शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी आज माध्यमांशी बोलताना स्थानिक स्वराज्य संस्था स्वबळावर लढवणार असल्याचे विधान केले होते. ते म्हणाले, “मुंबईपासून नागपूरपर्यंत आम्ही महापालिकेच्या निवडणुका स्वबळावर लढणार आहोत. मग काय होईल ते होईल? एकदा आम्हाला आमची ताकद बघायचीच आहे.

# सोलापूरच्या चादर व्यवसायाचे पानिपत!

## बनावट चादरींनी सोलापूरची संपूर्ण बाजारपेठ काबीज केली

।कोल्हापूर।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**एकमेकांत गुंतलेल्या धाग्यांनिशी बनलेल्या विशिष्ट आणि सुबक नक्षीकाम असलेल्या सोलापुरी चादरी म्हणजे महाराष्ट्रातील ‘भौगोलिक मानांकन’ (जीआय) मिळालेले पहिले उत्पादन. ६०च्या दशकापासून सोलापुरातून देशभर पोहोचत असलेल्या या चादरींना २००५ मध्ये मानांकन मिळाले, पण या व्यवसायाला ओहोटी लागली.**



देशाच्या अन्य भागांतून या चादरींची हुबेहूब पण दर्जा नसलेली नक्कल करून बनवलेल्या चादरी ‘सोलापुरी’ म्हणून बाजारात खपू लागल्या तसा मूळच्या सोलापुरी चादरींचा रंगच उडाला. एके काळी सोलापूरच्या वस्त्रोद्योगाचे ‘भारवाही’ असलेले हे उत्पादन आता जेमतेम दहा टक्क्यांवर घसरले आहे.हरियाणातील पानिपत, पंजाबमधील लुधियानासह तमिळनाडूतील इरोड, करूर, चेन्नमलाई, मदुराईतून यंत्रमागावर तयार होणाऱ्या चादरी सोलापुरी चादरी म्हणून स्वस्त दरात विकल्या जात आहेत. दिसायला हुबेहूब, सुंदर नक्षीकाम आणि आकर्षक रंगसंगतीच्या या बनावट सोलापुरी चादरी वजनाने तेवढ्याच हलक्या, कमी टिकाऊ आणि स्वस्त दरात सहज उपलब्ध होतात. याच बनावट चादरींनी सोलापूरची संपूर्ण बाजारपेठ काबीज केली आहे. ही नक्कल थांबविण्यासाठी यापूर्वी स्थानिक उद्योजकांनी केंद्रीय वस्त्रोद्योग समितीकडे गाऱ्हाणे मांडले होते. त्या प्रयत्नांतून सोलापुरी चादरीला जीआय-८ आणि टॉवेल उत्पादनाला जीआय-९ (जिओग्राफिकल इंडिकेशन रजिस्ट्रेशन) मानांकन मिळविले होते. परंतु त्याचा काहीच फरक पडलेला नाही.६०च्या दशकात किसनराव क्षीरसागर यांनी सोलापुरी चादरीची सर्वप्रथम निर्मिती केली. तेव्हापासून या चादर उद्योगाने सोलापूरचे अर्थकारण बदलून टाकले. मात्र, या व्यवसायातील काळानुरूप बदल न स्वीकारले गेल्याने चादर निर्मितीस मर्यादा येऊ लागल्या.

### 14 हजार पारंपरिक यंत्रमाग

आधुनिक यंत्रमागांच्या साह्याने उत्पादन आणि दर्जावाढीकडे भर दिलाच गेला नाही. देशात अनेक वस्त्रोद्योग नगरांमध्ये केंद्र व राज्य सरकारांच्या मदतीने ‘टेक्स्टाइल पार्क’ उभे राहिले, मात्र सोलापुरात गरज असतानाही याबाबत पावले उचलली गेली नाहीत.सोलापुरात सध्या पारंपारिक यंत्रमागांची संख्या १४ हजारांवर राहिली आहे. काही नवउद्योजकांनी सोलापुरी चादरीच्या उत्पादनातील पारंपरिक बाज कायम ठेवून, रॅपियर्ससारख्या आधुनिक यंत्रमागावर उत्पादन सुरू केले आहे. पारंपरिक यंत्रमागावर दिवसा १० चादरी तयार होतात, तर रॅपियर्सवर १२ तासांत ३० चादरींचे उत्पादन होते. रॅपियर्स यंत्रमागांची संख्या सध्या ३० ते ४० इतकीच आहे.

# रुपयाच्या घसरणीचे सर्व विक्रम मोडले!

## पंतप्रधानांनी जनतेला उत्तर द्यावे: प्रियांका गांधी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकी चलनाची वाढती मजबुती आणि परदेशी गुंतवणुकीचे मोठ्या प्रमाणात देशाबाहेर सुरू असलेल्या गमनापुढे रुपयाचा प्रतिकार अपयशी ठरला असून, शुक्रवारच्या सत्रात रुपया आणखी १८ पैशांनी घसरला आणि इतिहासात पहिल्यांदाच रुपयाने डॉलरच्या तुलनेत ८६.०४चा टप्पा गाठला आहे. चिंतेची बाब म्हणजे रुपयाच्या निरंतर गटांगळीचा हा सलग १० वा आठवडा असून, यातून रिझर्व्ह बँकेकडील परकीय गंगाजळीही वेगाने आटत चालली आहे. यानंतर काँग्रेस नेत्या आणि वायनाडच्या खासदार प्रियांका गांधी वड्रा यांनी शनिवारी केंद्र सरकारवर टीका करत पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून या मुद्द्यावर उत्तर मागितले आहे.**





आज प्रियांका गांधी यांनी एक्सवर पोस्ट करत रुपया सतत घसरत असल्याचे कारण देत पंतप्रधानांनी याबाबत देशातील जनतेला उत्तर द्यावे असे म्हटले आहे. त्या म्हणाल्या, “डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य आतापर्यंतच्या नीचांकी पातळीवर पोहोचले आहे. इतिहासात पहिल्यांदाच डॉलरची किंमत ८६.०४ रुपये झाली आहे.”प्रियांका गांधी आपल्या पोस्टमध्ये पुढे म्हणाल्या, “डॉ. मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात, जेव्हा डॉलरची किंमत ५८-५९ रुपये होती, तेव्हा नरेंद्र मोदी रुपयाच्या मूल्याला सरकारच्या प्रतिष्ठेशी जोडत असायचे. ते म्हणायचे, मला सगळं माहिती आहे. कोणत्याही देशाचे चलन असं घसरू शकत नाही. आज ते स्वतः पंतप्रधान आहेत आणि रुपयाच्या घसरणीचे सर्व विक्रम मोडले आहेत.

त्यांनी देशातील जनतेला याचे उत्तर द्यावे.” दरम्यान, २०१३ मध्ये जेव्हा यूपीए सरकारच्या काळात रुपयाची किंमत (DOLLAR VS RUPEE) घसरली होती तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्यावर जोरदार टीका केली होती.गेल्या काही आठवड्यांपासून परकीय चलन साठ्यात सतत घट सुरू आहे. तसेच रुपयातील अस्थिरता कमी करण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून चलन बाजारात सुरू राहिलेल्या हस्तक्षेपातून ही घसरण वाढत आहे. सप्टेंबरअखेर भारतीय रिझर्व्ह बँकेकडील परकीय चलन साठा ७०४.८८५ अब्ज डॉलरच्या सार्वकालिक उच्चांकावर होता, त्या पातळीवरून तो तीन महिन्यांत ७० अब्ज डॉलरहून अधिक गडगडला आहे. युरो, पौंड आणि येन सारख्या गैर-अमेरिकी चलनांचे मधल्या काळात झालेले अवमूल्यन हे एकूण चलन मालमत्तेच्या ऱ्हासास कारणीभूत ठरले आहे. गंगाजळीतील सुवर्ण साठा मात्र गेल्या आठवड्यात वाढून ६७.०९२ अब्ज अमेरिकी डॉलरवर पोहोचला आहे.आज प्रियांका गांधी यांनी एक्सवर पोस्ट करत रुपया सतत घसरत असल्याचे कारण देत पंतप्रधानांनी याबाबत देशातील जनतेला उत्तर द्यावे असे म्हटले आहे. त्या म्हणाल्या, “डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य आतापर्यंतच्या नीचांकी पातळीवर पोहोचले आहे. इतिहासात पहिल्यांदाच डॉलरची किंमत ८६.०४ रुपये झाली आहे.”प्रियांका गांधी आपल्या पोस्टमध्ये पुढे म्हणाल्या, “डॉ. मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात, जेव्हा डॉलरची किंमत ५८-५९ रुपये होती, तेव्हा नरेंद्र मोदी रुपयाच्या मूल्याला सरकारच्या प्रतिष्ठेशी जोडत असायचे. ते म्हणायचे, मला सगळं माहिती आहे. कोणत्याही देशाचे चलन असं घसरू शकत नाही. आज ते स्वतः पंतप्रधान आहेत आणि रुपयाच्या घसरणीचे सर्व विक्रम मोडले आहेत.

### अमेरिकी चलनाची मजबुती

दरम्यान, २०१३ मध्ये जेव्हा यूपीए सरकारच्या काळात रुपयाची किंमत घसरली होती तेव्हा मोदी यांनी तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्यावर जोरदार टीका केली होती.गेल्या काही आठवड्यांपासून परकीय चलन साठ्यात सतत घट सुरू आहे. तसेच रुपयातील अस्थिरता कमी करण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून चलन बाजारात सुरू राहिलेल्या हस्तक्षेपातून ही घसरण वाढत आहे. सप्टेंबरअखेर भारतीय रिझर्व्ह बँकेकडील परकीय चलन साठा ७०४.८८५ अब्ज डॉलरच्या सार्वकालिक उच्चांकावर होता, त्या पातळीवरून तो तीन महिन्यांत ७० अब्ज डॉलरहून अधिक गडगडला आहे. युरो, पौंड आणि येन सारख्या गैर-अमेरिकी चलनांचे मधल्या काळात झालेले अवमूल्यन हे एकूण चलन मालमत्तेच्या ऱ्हासास कारणीभूत ठरले आहे. अमेरिकी चलनाची वाढती मजबुती आणि परदेशी देशाबाहेर सुरू असलेल्या गमनापुढे रुपयाचा प्रतिकार अपयशी ठरला असून, शुक्रवारच्या सत्रात रुपया आणखी १८ पैशांनी घसरला आणि इतिहासात पहिल्यांदाच रुपयाने डॉलरच्या तुलनेत ८६.०४चा टप्पा गाठला आहे.

# बायकोला पाहत बसणं मला आवडतं

## महिंद्रा यांचा उपरोधिक टोला; लाइफ बॅलन्सवर सडेतोड भूमिका

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इन्फोसिसचे प्रमुख नारायण मूर्ती यांनी तरुणांना आठवड्याचे ७० तास काम करण्याचा सल्ला काही काळापूर्वी दिला होता. त्यानंतर लार्सन अँड टुब्रोचे अध्यक्ष एसएन सुब्रह्मण्यम यांनी कर्मचाऱ्यांना आठवड्यातून ९० तास काम करण्याचे आवाहन दोन दिवसांपूर्वी केले होते.**

एकाबाजूला कामाबरोबरच वैयक्तिक आयुष्याचा ताळमेळ (वर्क लाईफ बॅलन्स) साधण्यात कर्मचाऱ्यांना प्रचंड कसरत करावी लागत असते. त्यातून ताण-तणाव निर्माण होत असतो. यातच कॉर्पोरेट नेत्यांनी अशाप्रकारची विधाने केल्यामुळे देशभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या होत्या. अनेकांनी सोशल मीडियावर या सल्ल्याचा निषेध केला. आता प्रसिद्ध उद्योगपती आणि महिंद्रा ग्रुपचे प्रमुख आनंद महिंद्रा यांनीही यावर सडेतोड आणि उपरोधिक भाष्य केले आहे. कामाच्या तासांपेक्षा कामाच्या दर्जाला अधिक महत्त्व दिले पाहीजे, असे ते म्हणाले आहेत. दिल्ली येथे ‘विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग २०२५’ या संमेलनाला संबोधित करत असताना आनंद महिंद्रा यांनी ‘वर्क लाईफ बॅलन्स’ आणि एसएन सुब्रह्मण्यम यांच्या विधानावर भूमिका मांडली. पत्रकार





पालकी शर्मा यांनी आनंद महिंद्रा यांना ते किती तास काम करतात? असा प्रश्न विचारला. त्यावर आनंद महिंद्रा म्हणाले, “मी हे नेहमी टाळत आलो आहे. माझ्यासाठी किती तास काम केले, हे महत्त्वाचे नाही. मला कामाच्या दर्जाबाबत विचारा. त्यामुळे किती तास काम केले, त्यापेक्षा कोणत्या दर्जाचे काम झाले, हे महत्त्वाचे आहे.”आनंद महिंद्रा पुढे म्हणाले, “मी नारायण मूर्ती आणि इतरांचा आदर करतो. त्यामुळे त्यांच्या विधानाबाबत मला चुकीचे समजू नका. यावर उपरोधिक टोला लगावताना आनंद महिंद्रा म्हणाले, “मी सोशल मीडियावर सक्रिय असतो, याचा अर्थ मी मोकळा आहे, असे अजिबात नाही. माझी पत्नी छान आहे, तिला पाहत बसायला मला आवडतं. मी सोशल मीडियावर मित्र यादी वाढवायला आलेलो नाही. सोशल मीडिया हे एक उत्तम बिझनेस टुल आहे, म्हणून मी त्याचा वापर करतो. मला असंख्या लोकांकडून सूचना प्राप्त होतात.”

### मेरी पत्नी बहुत ही अच्छी हैं।

पण मला वाटते, ही चर्चा चुकीच्या दिशेला जात आहे. कामाच्या दर्जावर आपण अधिक चर्चा करायला हवी. त्यामुळे ४० की ४८ किंवा ७० की ९० तास केले, हे महत्त्वाचे नाही. तुम्ही १० तास चांगले काम करू शकत असाल तर त्यातूनही जग बदलता येते.”‘कर्मचाऱ्यांनी रविवारीही काम केले पाहीजे. किती वेळ तुम्ही पत्नीला पाहत बसणार. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी रविवारीही काम केले तर मला आनंद होईल’, असे विधान लार्सन अँड टुब्रोचे अध्यक्ष एसएन सुब्रह्मण्यम यांनी केले होते.

# शाहरुख स्टार होण्यापूर्वीची आठवण



बॉलिवूड अभिनेत्री मनीषा कोईरा(MANISHA KOIRALA)ला ही ९० च्या दशकातील सर्वात प्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक आहे. आता मात्र अभिनेत्री तिच्या एका वक्तव्यामुळे चर्चेत आली आहे. मनीषाने बॉलिवूडचा किंग शाहरुख खान(SHAH RUKH KHAN) आणि तिच्या बॉलिवूडमधील करियरच्या सुरूवातीच्या दिवसांबद्दल भाष्य केले आहे. या दोन कलाकारांनी १९९८ साली प्रदर्शित झालेल्या 'दिल से' या चित्रपटात एकत्र काम केले होते. मनीषा कोईरालाने नुकतीच पिंकविलाला मुलाखत दिली. यावेळी बोलताना अभिनेत्रीने शाहरुख स्टार बनण्याच्या अगोदर जेव्हा तो त्याची पत्नी गौरी हिच्याबरोबर माऊंट मेरी येथील अपार्टमेंटमध्ये राहात होता, तेव्हाची आठवण सांगितली आहे. मनीषाने शाहरुख बरोबरच्या मैत्रीबद्दल म्हटले , "अभिनय क्षेत्रात आम्ही दोघेही अगदीच नवीन होतो, त्यावेळी आमची भेट झाली होती. त्यावेळी मी बऱ्याचदा शाहरुख आणि गौरी यांच्याबरोबर वेळ घालवत असे. त्याच्या फ्लॅटमध्ये चटई अंथरलेली असे आणि आम्ही सगळे त्यावर गप्पा मारत बसायचो."मनीषाने पुढे बोलताना म्हटले की, शाहरुख खान हा पहिला व्यक्ति होता ज्याने मला मुंबईत घर विकत घेण्याचा सल्ला दिला. ती म्हणाली, "आम्ही सगळे मित्र होतो आणि आमचं वय खूप कमी होतं. मी त्याच्या एक किंवा दोन वर्ष आधी मुंबईत आले होते. आमची चांगली मैत्री झाली. त्यानेच मला मुंबईमध्ये घर घेण्याचा सल्ला दिला होता, असा सल्ला देणारा तोच पहिला व्यक्ती होता. तो म्हणाला की आपण दोघेही मुंबईच्या बाहेरून आलो आहोत आणि इथं राहण्यासाठी आपल्याला जागा हवी. त्यामुळं आपलेपणा येईल. तू इथे स्थायिक होशील."



## तंत्रज्ञानानुसार सुविधा देण्यावर भर

एखादी इमारत ही अभियंत्यापेक्षा वास्तुविशारदाच्या नावाने ओळखली जाते, परंतु मी नम्रपणे खरे सांगतो की चित्रपटसृष्टीत लेखकांना अपेक्षित श्रेय मिळत नाही. याबाबत माझी वैयक्तिक तक्रार नाही, मला आजवर चित्रपटसृष्टीने भरभरून प्रेम दिले आहे. मात्र आजही काही उल्लेखनीय लेखकांना अपेक्षित श्रेय मिळत नाही. चित्रपट या कलाकृतीचा महत्त्वाचा घटक असलेल्या अशा लेखकांना प्रकाशझोतात आणून नावलौकिक, योग्य तो मान व दाम मिळणे आवश्यक आहे', असे मत ज्येष्ठ लेखक आणि गीतकार जावेद अख्तर यांनी व्यक्त केले. तसेच भारतात उत्तम कलागुण व कलारत्नांची खाण असून त्याला योग्य तो वाव मिळाला पाहिजे. तसेच आपण आपल्या मातीतील प्रादेशिक कलाकृतींसाठी आग्रही राहायला हवे', असेही जावेद अख्तर म्हणाले. एशियन फिल्म फाऊंडेशन आयोजित २१ व्या 'थर्ड आय' आशियाई चित्रपट महोत्सवाला शुक्रवारपासून सुरुवात झाली. या महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्र फिल्म स्टेज अँड कल्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांच्या हस्ते अंधेरी येथील मूव्हीमॅक्स चित्रपटगृहात शुक्रवारी झाले. याप्रसंगी चित्रपट क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल 'एशियन फिल्म कल्चर अ‍ॅवॉर्ड' या विशेष पुरस्काराने जावेद अख्तर यांना गौरविण्यात आले. या वेळी एशियन फिल्म फाऊंडेशनचे अध्यक्ष किरण व्ही. शांताराम, महोत्सवाचे संचालक डॉ. संतोष पाठारे, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी उपस्थित होते.

## स्वरा भास्करचे रोमॅंटिक फोटो



स्वरा भास्कर सध्या तिच्या प्रेग्नेंसीच्या टप्प्याचा आनंद घेत आहे. दुसरीकडे, सोमवारी अभिनेत्रीने तिच्या मॅटर्निटी फोटोशूटचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले. या फोटोंमध्ये तिचा नवरा फहाद स्वरासोबत रोमॅंटिक पोज देताना दिसत आहे. पोस्ट शेअर करताना स्वराने फोटो काढल्याबद्दल छायाचित्रकाराचे आणि फोटोंचा भाग असल्याबद्दल तिच्या पतीचे आभार मानले. पोस्ट शेअर करताना स्वराने लिहिले- 'कधीकधी आयुष्य अचानक तुम्हाला खूप काही देते. जीवनाच्या प्रवासात, तुम्हाला स्वतःला शोधण्याची आणि एकमेकांना आधार देण्याची संधी मिळते. माझ्या आयुष्यातील हा खास क्षण बरखा अग्रवाल यांनी सुंदरपणे टिपला आहे. पोस्टमध्ये स्वराने खुलासा केला की, तिचा पती फहाद मॅटर्निटी शूटबद्दल संकोच करत होता. म्हणाली- 'इच्छा नसतानाही मला सपोर्टिंग मॉडेलप्रमाणे साथ दिल्याबद्दल धन्यवाद.' स्वराने तिच्या इंस्टाग्राम हँडलवर 6 फोटो शेअर केले आहेत. यातील काही चित्रे कृष्णधवल आहेत, तर काही रंगीत आहेत. पहिल्या चित्रात फहाद आणि स्वरा एका सुकलेल्या झाडाच्या खोडावर बसलेले दिसत आहेत. दुस-या चित्रात, हे जोडपे रोमँटिक पोज देत आहे, स्वरा तिच्या बेबी बंपला दाखवत आहे. स्वरा भास्करने सोशल मीडियावर तिच्या गरोदरपणाची घोषणा केली होती. पती फहादसोबतचा फोटो शेअर करताना तिने एक अतिशय भावूक पोस्टही शेअर केली आहे. फोटो शेअर करताना स्वराने लिहिले- 'कधीकधी तुमची प्रत्येक इच्छा एकाच वेळी पूर्ण होते. या नवीन प्रवासात पाऊल ठेवण्यासाठी मी खूप उत्साही, आभारी आहे. फहाद आणि स्वरा यांची लव्हस्टोरी खूपच फिल्मी होती. विशेष विवाह कायदा, 1954 अंतर्गत 6 जानेवारी 2023 रोजी त्यांचे लग्न झाले. मात्र, लग्नानंतर तब्बल एक महिन्यानंतर अभिनेत्रीने ही गोष्ट अधिकृत केली. फहाद आणि स्वरा यांची पहिली भेट 2019 मध्ये एका प्रोटेस्ट दरम्यान झाली होती. स्वरा भास्कर सध्या तिच्या प्रेग्नेंसीच्या टप्प्याचा आनंद घेत आहे. दुसरीकडे, सोमवारी अभिनेत्रीने तिच्या मॅटर्निटी फोटोशूटचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले. या फोटोंमध्ये तिचा नवरा फहाद स्वरासोबत रोमॅंटिक पोज देताना दिसत आहे.

## वैजयंतीमालांनी केले भरतनाट्यम !

ज्येष्ठ अभिनेत्री वैजयंतीमाला यांनी 13 ऑगस्ट रोजी आपला 91 वा वाढदिवस साजरा केला. यावेळी त्यांनी भरतनाट्यम नृत्य सादर केले. त्यांच्या डान्सचा व्हिडिओ सोशल मीडियावर आला आहे. या व्हिडिओमध्ये वैजयंतीमाला वयाच्या 91 व्या वर्षीही चांगला डान्स करताना दिसत आहेत. अभिनेत्री पारंपारिक नृत्याच्या चालींवर उत्तम अभिव्यक्तिसह नाचताना दिसत आहेत. व्हिडिओमध्ये वैजयंती माला यांनी वाढदिवसानिमित्त आयोजित गेट-टूगेदर पार्टीत स्टेजवर काही लोकांसमोर हा डान्स केला. त्यांच्या नृत्याच्या तालावर लोक मध्येच टाळ्या वाजवत आहेत. अभिनेत्रीने सुमारे 4 मिनिटे सलग नृत्य केले. सोशल मीडिया यूजर्स या व्हिडिओवर कमेंट करत अभिनेत्रीचे कौतुक करत आहेत. एका युझरने व्हिडिओवर लिहिले - त्यांनी हे सर्व अतिशय उत्तमरित्या केले आहे. या वयातही त्यांची मुद्रा आणि त्यांचे भाव अगदी परफेक्ट आहेत. त्याच वेळी, एका वापरकर्त्याने लिहिले - वैजयंतीमाला वयाच्या 91 व्या वर्षी परिपूर्ण भरतनाट्यम नृत्य करत आहेत आणि वयाच्या 20 व्या वर्षी हे टाइप करताना माझी पाठ दुखत आहे.

## भाऊराव कऱ्हाडे अडकणार लग्नबंधनात?

मराठमोळे आणि लोकप्रिय दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे यांना 'ख्वाडा'आणि 'बबन' आणि आता टीडीएम सारख्या चित्रपटांमधून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे हा मराठी मनोरंजन विश्वातील खुप प्रसिद्ध चेहरा आहे. काही दिवसांपुर्वी त्यांचा टीडीएम हा वेगळ्या थाटणीचा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. आता भाऊराव यांनी चाहत्यांसोबत एक आनंदाची बातमी शेयर केली आहे. ते लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. सोशल मीडियावर होणाऱ्या पत्नीसोबतचा फोटो शेयर करत त्यांनी ही बातमी दिली. जोडीदारासोबत फोटो शेयर करत त्यांनी कॅप्शनमध्ये लिहिलयं , "आता लवकरच खरा सिनेमा सुरू.... तुम्ही सगळ्यांनी आशिर्वाद द्यायला



नक्की यायचंय..." त्यांची ही पोस्ट सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. त्याचे चाहते त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करत आहे. भाऊ कऱ्हाडे यांनी ख्वाडा, बबन यासारऱ्या अस्सल गावरान ढंगातील, रंगातील चित्रपट प्रेक्षकांसमोर आणत आपली वेगळी ओळख निर्माण केले आहे. गेल्या काही दिवसांपुर्वी भाऊ आणि त्यांचा टीडीएम नावाचा चित्रपट चर्चेत आला होता. या सिनेमाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या चित्रपटाला थिएटरमध्ये स्क्रिन्सच न मिळाल्यानं कलाकार, निर्माते आणि दिग्दर्शक यांच्या डोळ्यात पाणी होते. त्यानंतर अनेक राजकिय नेते आणि कलाकारांनी त्यांना पाठिंबा दिला होता. आता ते त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आले आहे. त्याच्या आयुष्याची नवीन सुरुवात ते करत आहेत.

# मॅच पाहायला गेला लखपती झाला!

## केनच्या षटकाराने चाहत्याचं नशीब कसं बदललं?

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**न्यूझीलंडचा स्टार फलंदाज केन विल्यमसन सध्या दक्षिण आफ्रिकेत खेळल्या जाणाऱ्या एसए२०ट्रेन्टी मध्ये दिसत आहे. किवी फलंदाज या स्पर्धेत डर्बन सुपर जायंट्सकडून खेळत आहे. विल्यमसनने स्पर्धेतील दुसऱ्या सामन्यात एक शानदार षटकार ठोकला. जो थेट प्रेक्षकांच्या गॅलरीत पोहोचला, जिथे एका प्रेक्षकाने एका हाताने झेल घेऊन सुमारे ९० लाख रुपये जिंकले. ज्याची सध्या या सामन्यापेक्षा खूप चर्चा आहे. नक्की त्या प्रेक्षकांने ९० लाख रुपये कसे जिंकले? जाणून घेऊया.**



या स्पर्धेतील दुसरा सामना डर्बन सुपर जायंट्स आणि प्रिटोरिया कॅपिटल्स यांच्यात झाला. या सामन्यात सुपर जायंट्सने प्रथम फलंदाजी करताना ४ बाद २०९ धावा केल्या होत्या. यादरम्यान केले विल्यमसनने ४० चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ६० धावांची सर्वाधिक धावांची खेळी खेळली. या खेळीदरम्यान विल्यमसनने लेग साइडवर एक उत्तुंग षटकार मारला, जो प्रेक्षक गॅलरीत पोहोचला जिथे उपस्थित असलेल्या एका चाहत्याने तो चेंडू एका हाताने पकडला.या कॅचसाठी चाहत्याला २० लाख दक्षिण आफ्रिकन रँड म्हणजेच सुमारे ९० लाख रुपये मिळाले. या लीगच्या नियमांनुसार, १८ वर्षांवरील प्रेक्षकाला एका हाताने षटकाराचा क्लीन कॅच घेणाऱ्यांना १० लाख रँडचे बक्षीस ठेवले आहे. विशेष म्हणजे जर झेल घेणारा चाहता सामन्यापूर्वीच शीर्षक प्रायोजकाचा ग्राहक असेल, तर त्याची बक्षीस रक्कम दुप्पट केली जाते. या झेलवर समालोचक मार्क निकोल्स म्हणाले, 'हा चाहता क्रिकेट खेळतो का? जर खेळत असेल तर बक्षिसाची रक्कम तिप्पट करा. हा एक अप्रतिम झेल आहे.'या सामन्याबद्दल बोलायचे तर डर्बन सुपर जायंट्सने प्रथम फलंदाजी करताना ४ गडी गमावून २०९ धावा केल्या. केन विल्यमसनने ४० चेंडूत ६० धावांची नाबाद खेळी केली. सलामीवीर ब्राइस पर्सन्सने २८ चेंडूत ४७ धावा केल्या तर मुल्डरने १९ चेंडूत ४५ धावा करत संघाला मोठी धावसंख्या उभारुन दिली होती. प्रत्युत्तरात प्रिटोरिया कॅपिटल्सचा सलामीवीर रहमानउल्ला गुरबाजने ४३ चेंडूत ८९ धावांची तुफानी खेळी केली. त्याच्या खेळीत ७ षटकारांचा समावेश होता. विल जॅकसोबत (३५ चेंडूत ६४ धावा) त्याने पहिल्या विकेटसाठी १५४ धावांची भागीदारी केली. विशेष म्हणजे ९ विकेट्स हातात असूनही शेवटच्या ४७ चेंडूत केवळ ५६ धावाच करता आल्या. संघाने हा सामना २ धावांनी गमावला. शेवटच्या षटकात विजयासाठी १४ धावांची गरज होती, पण कॅपिटल्सचे फलंदाज केवळ ११ धावाच करू शकले.

### चाहत्याला मिळाले 90 लाख रुपये

या झेलवर समालोचक मार्क निकोल्स म्हणाले,'हा चाहता क्रिकेट खेळतो का? जर खेळत असेल तर बक्षिसाची रक्कम तिप्पट करा. हा एक अप्रतिम झेल आहे.'या सामन्याबद्दल बोलायचे तर डर्बन सुपर जायंट्सने प्रथम फलंदाजी करताना ४ गडी गमावून २०९ धावा केल्या. केन विल्यमसनने ४० चेंडूत ६० धावांची नाबाद खेळी केली. सलामीवीर ब्राइस पर्सन्सने २८ चेंडूत ४७ धावा केल्या तर मुल्डरने १९ चेंडूत ४५ धावा करत संघाला मोठी धावसंख्या उभारुन दिली होती. प्रत्युत्तरात प्रिटोरिया कॅपिटल्सचा सलामीवीर रहमानउल्ला गुरबाजने ४३ चेंडूत ८९ धावांची तुफानी खेळी केली. त्याच्या खेळीत ७ षटकारांचा समावेश होता. विल जॅकसोबत (३५ चेंडूत ६४ धावा) त्याने पहिल्या विकेटसाठी १५४ धावांची भागीदारी केली. विशेष म्हणजे ९ विकेट्स हातात असूनही शेवटच्या ४७ चेंडूत केवळ ५६ धावाच करता आल्या. संघाने हा सामना २ धावांनी गमावला. शेवटच्या षटकात विजयासाठी १४ धावांची गरज होती, पण कॅपिटल्सचे फलंदाज केवळ ११ धावाच करू शकले.

धावाच करू शकले.या स्पर्धेतील दुसरा सामना डर्बन सुपर जायंट्स आणि प्रिटोरिया कॅपिटल्स यांच्यात झाला. या सामन्यात सुपर जायंट्सने प्रथम फलंदाजी करताना ४ बाद २०९ धावा केल्या होत्या. यादरम्यान केले विल्यमसनने ४० चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ६० धावांची सर्वाधिक धावांची खेळी खेळली. या खेळीदरम्यान विल्यमसनने लेग साइडवर एक उत्तुंग षटकार मारला, जो प्रेक्षक गॅलरीत पोहोचला जिथे उपस्थित असलेल्या एका चाहत्याने तो चेंडू एका हाताने पकडला.या कॅचसाठी चाहत्याला २० लाख दक्षिण आफ्रिकन रँड म्हणजेच सुमारे ९० लाख रुपये मिळाले. या लीगच्या नियमांनुसार, १८ वर्षांवरील प्रेक्षकाला एका हाताने षटकाराचा क्लीन कॅच घेणाऱ्यांना १० लाख रँडचे बक्षीस ठेवले आहे. विशेष म्हणजे जर झेल घेणारा चाहता सामन्यापूर्वीच शीर्षक प्रायोजकाचा ग्राहक असेल.

# तमीम-ॲलेक्स हेल्समध्ये मैदानातच जुंपली

## हेल्सच्या आरोपांवर तमीम इक्बाल काय म्हणाला?

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**क्रिकेटच्या मैदानावर खेळादरम्यान अनेक वेळा खेळाडू एकमेकांशी भांडताना दिसतात. ही भांडणं सहसा खेळाशी संबंधित असतात. परंतु असे काही वेळा होते, जेव्हा खेळाडूंमधील भांडणं खेळाच्या पलीकडे जातात. असाच काहीसा प्रकार बांगलादेश प्रीमियर लीगमध्ये तमिम इक्बाल आणि अॅलेक्स हेल्स यांच्यात पाहायला मिळाला. या भांडणात बांगलादेशी क्रिकेटर तमीम इक्बालने मर्यादा ओलांडल्याने प्रकरण चांगलेच तापले.**



वास्तविक, ही संपूर्ण घटना बांगलादेश प्रीमियर लीगच्या २०२५ च्या रंगपूर रायडर्स आणि फॉर्च्युन बरीशाल सामन्यानंतर घडली. जेव्हा रंगपूर रायडर्सचा सलामीवीर फलंदाज अॅलेक्स हेल्स फॉर्च्युन बरीशालचा कर्णधार तमीम इक्बालशी हस्तांदोलन करण्यासाठी गेला होता. या सामन्यात रंगपूर रायडर्स संघाने शेवटच्या षटकात रोमहर्षक विजय मिळवला. या सामन्यातील पराभवानंतर बरीशालचा कर्णधार तमीम इक्बाल चांगलाच निराश झाला होता. यावेळी तो अॅलेक्स हेल्सशी हस्तांदोलन करण्यासाठी गेला असता वाद झाला. रिपोर्ट्सनुसार, फायनलमधील पराभवामुळे नाराज झालेल्या तमीम इक्बालशी हस्तांदोलन करण्यासाठी अॅलेक्स हेल्स आला होता, तेव्हा फॉर्च्युन बारिशालचा कर्णधार इंग्लंडच्या खेळाडूला म्हणाला, 'तू असं का वागतोय? तुला काही बोलायचे असेल तर माझ्यासमोर बोल. तमिमच्या अशा बोलण्याने अॅलेक्स हेल्स चांगलाच संतापला आणि दोघात वाद पेटला. प्रकरण इतके वाढले की सहकारी खेळाडूंना मध्यस्थी करुन या दोघांना एकमेकांपासून दूर करावे लागले.या घटनेनंतर अॅलेक्स हेल्सने तमिमवर वैयक्तिक कमेंट करत तो अजूनही ड्रग्ज घेत आहे का?

### ॲलेक्स हेल्स काय म्हणाला?

असं विचारल्याचा आरोप केला आहे. २०१९ मध्ये अॅलेक्स हेल्सवर ड्रग्ज घेतल्याचा आरोप होता, त्यामुळे त्याच्यावर इंग्लंड क्रिकेट बोर्डाने बंदी घातली होती. या प्रकरणावर तमिमने त्याच्यावर भाष्य केले. अॅलेक्स हेल्स मुलाखतीत या घटनेचा उल्लेख करताना म्हणाला की, "मला माहित नाही, तमीम कोणत्या गोष्टीबद्दल नाराज होता. आम्ही हस्तांदोलन करताना त्याने मला विचारले की, तुला काही बोलायचे आहे का आणि जर बोलायचे असेल तर माझ्यासमोर बोल. यानंतरही मी त्याला काहीच बोललो नाही.